(५२)

सह आयुक्त कार्यालय,
करआकारणी व करसंकलन विभाग.
पुणे महानगरपालिका.
जा.क्रं.१(०)२३९० दिनांक. २२/१२/२०००

मा. सादर....

विषय : हॉटेल,हॉस्पीटल या मिळकतीमधील कॉमन पॅसेज,ए सी प्लॉटरूम जनरेटर रूम सर्व्हीस रूमच्या करआकारणीचा दर.

संदर्भ : १) खात्याचे निवेदन जा.क्रं. टीबीओ १४४८ दिनांक १५.९.२०००.व त्यावर मा. अति. महापालिका आयुक्त(ज) यांचे आदेश.
२)नगरअभियंता यांचेकडील अभिप्राय जा.क्रं. सीओओ/९२३ दिनांक१८.१२.२०००.

पुणे शहरामधील हॉटेल्सची करआकारणी करतांना हॉटेल मधील कॉमन पॅसेज, एसी प्लॉट रूम,जनरेटर रूम यांची करआकारणी मनपाच्या प्रचलीत बिगरनिवासी वाजवी अंदाजे भाडे विचारात घेऊन करण्याऐवजी करआकारणीचा दर रू.०.५० प्रति चौ. फूट या दराने करणेबाबत व बिगरनिवासी इमारतीमधील पाच फूट उंची असलेल्या लॉफ्टची करआकारणी सदर जागेचा वापर सामान ठेवण्यासाठी करण्यात येत असल्याने ती न करणेबाबत खात्याचे संदर्भांकित निवेदन मान्यतेसाठी सादर केले होते. प्रस्तुत निवेदनावर मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त यांनी "Pl.discuss" असे आदेश दिले होते. प्रस्तुत आदेशानुसार मा. अति. महापालिका आयुक्त यांचेशी समक्ष चर्चा झाली,चर्चेत मा.अति.मआ. आयुक्त(ज) यांनी दिलेल्या आदेशानुसार मा.नगरअभियंता यांचेकडून कॉमन पॅसेज, एसी प्लॉटरूम,जनरेटररूम,सर्व्हीस रूम, कॅनॉपी, पोर्च, पोटमाळा(लॉफ्ट) इ. एफ.एस.आय मंजूर करतांना धरले जात नाही याबाबत डी. सी. रूलमध्ये असलेल्या तरतूदीबाबत खात्याचे पत्र जा.क्रं. टीबीओ/२१४८ दिनांक ४.१२.२००० अन्वये माहिती मागविण्यात आली होती. त्यानुसार नगरअभियंता यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्रं.सीओओ/९२३ दिनांक १८.१२.२००० अन्वये माहिती व डी.सी. रूलबाबतची प्रत पाठविली असून ती सोबत अवलोकनार्थ सादर केली आहे.

मा.नगरअभियंता यांनी त्यांचा अभिप्राय खालीलप्रमाणे दिला आहे.
(१)इमारतीचे बाहेर कॅनोपी/पोर्च,आर्किटेक्चरल प्रोजेक्शन हे इमारतचे सौंदर्य वाढविण्यासाठी असल्याने व लॉफ्टचा वापर वस्तुंच्या स्टोअरेजसाठी होत असल्याने व त्याची उंची नॉन हेबिटेबल असल्याने त्यांची करआकारणी करणे योग्य ठरणार नाही.
(२) इमारतीमध्ये असलेली पार्कींग व्यवस्था, इले.सबस्टेशन, पंपहाऊस ,पाण्याची टाकी, इले, फिटींग्ज व अग्नीशामककरिता लागणारी डक्टस शॉफ्ट व लेटर बॉक्सेस, सिमाभिंत इ. क्षेत्रावर करआकारणी करू नये.
(३) एसी प्लॉटरूम, सर्व्हीस फ्लोअर एरीया हे तारांकीत हॉटेल्स, हॉस्पीटल्स स्वरूपाचे बांधकाम क्षेत्राचा वापर विशिष्ट इमारतीसाठी विशेष सुविधा पुरविण्याकरीता होत असल्याने सदर क्षेत्रावर नियमाप्रमाणे अनुज्ञेय दराच्या २५% दर धरून आकारणी करावी.
(४) सुधारित विकास नियंत्रण नियमावलीनुसार विशिष्ट रूंदीचे जिने व मजला क्षेत्राच्या काही प्रमाणात सामाईक पॅसेज क्षेत्र चटई क्षेत्र मुक्त अनुज्ञेय करण्यात येते त्यामुळे सामाईक पॅसेज क्षेत्रावर निवासी /व्यापारी दरावर ५०% दराने करआकारणी करणे अगर आपल्या विभागाकडील नियमाप्रमाणे करआकारणी करावी.

मा.नगरअभियंता यांनी दिलेला अभिप्राय विचारात खात्याने मूळ निवेदनातील 'ब' प्रस्तावात नमुद केलेल्या बाबीस मा. महापालिका आयुक्त यांची मर्जानुरूप मान्यता मिळणेस विनंती आहे.

मा. सादर

सह आयुक्त.
पुणे महानगरपालिका.

मा. अति. महापालिका आयुक्त(ज)
पुणे महानगरपालिका.

मा. महापालिका आयुक्त.
पुणे महानगरपालिका.

2.2 DEC 2000

अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका